MH-IT/IN/1221/02716


**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.**

**दूरध्वनी क्र.०२२-२२७९४१९६** **Email ID :kishor.gokhale@gov.in**


---

**क्रमांक:टिपीएस-१८१५/५२७/प्र.क्र.१३९/१५/नवि-१३** दिनांक : ०७ /१२/२०२१

**प्रति,**

१. आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
२. महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.
३. सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.
५. सर्व नवनगर विकास प्राधिकरणे.
६. सर्व जिल्हाधिकारी
७. सहायक संचालक, नगर रचना / नगर रचनाकार, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, सर्व शाखा कार्यालये
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हापरिषद.

**विषय:-** मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नुसार Building Plan Management System (BPMS) संगणकीय प्रणालीद्वारे परवानगीबाबत....

**संदर्भ :-** १. शासनाकडील दि.०५/०५/२०२१ रोजीची पत्रे क्र.टिपीएस-१८१५/५२७/ प्र.क्र.१३९/१५/नवि-१३,
२. शासनाकडील दि.०६/०८/२०२१ रोजीचे पत्र क्र.टिपीएस-१८१५/५२७/ प्र.क्र.१३९/१५/नवि-१३
३. शासनाकडील दि.१५/०९/२०२१ रोजीचे पत्र क्र.टिपीएस-१८१५/५२७/ प्र.क्र.१३९/१५/नवि-१३
४. शासनाकडील दि.११/१०/२०२१ रोजीचे पत्र क्र.टिपीएस-१८१५/५२७/ प्र.क्र.१३९/१५/नवि-१३
५. मा.प्रधान सचिव (नवि-१) यांचे दालनामध्ये आयोजित दि.१५/११/२०२१ रोजीची बैठक.


Maha IT
(122) 07 DEC 2021
Received


महोदय,

**०१.** शासनाने दि.०२.१२.२०२० च्या अधिसूचनेन्वये, त्यामध्ये नमूद केलेले क्षेत्र वगळता राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे तसेच प्रादेशिक योजना क्षेत्रांसाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मंजूर केली असून ती दि.०३.१२.२०२० पासुन अंमलात आली आहे.

०२. शासनाने संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये राज्यातील ६ महानगरपालिका ( ठाणे/नाशिक/औरंगाबाद/अकोला/कोल्हापूर/नागपूर), ६ जिल्हाधिकारी व सहायक संचालक, नगर रचना कार्यालये (रायगड/अहमदनगर/लातूर/अमरावती/चंद्रपूर/सातारा), ६ नगरपरिषदा (सावंतवाडी/भुसावळ/बीड/अचलपूर/वर्धा/बारामती) यांना त्यांचेकडील BPMS प्रणाली Unified DCPR प्रमाणे महाआयटीने तयार केलेल्या प्रणालीनुसार सुधारित करुन घेऊन त्यानुसार ऑनलाईन विकास परवानगी देण्याबाबत कार्यवाही दि.०१/०४/२०२१ पासून सुरु करण्यास मान्यता दिली होती.

०३. तसेच शासनाने संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये वर नमूद प्राधिकरणे, जिल्हे वगळता राज्यातील अन्य प्राधिकरणांना/जिल्ह्यांना प्रस्तावित तक्त्यानुसार सदर संगणक प्रणाली त्यांना लागू करण्यात येणार असून सदर प्रणाली वापरण्यास उपलब्ध होत नाही तोपर्यंतच्या कालावधीमध्ये विकास परवानगी प्रस्ताव ऑफलाईन स्वीकारुन अशा प्रस्तावांना मंजूरी देण्याबाबत कार्यवाही करण्यास कळविले होते.

०४. त्यानंतर शासनाने संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये सावंतवाडी/भुसावळ/बीड/अचलपूर/वर्धा/बारामती वगळता उर्वरित सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींना महाआयटी कडून दि.०१.०८.२०२१ ते दि.१४.०८.२०२१ या कालावधीत राज्यातील काही नगरपरिषदा / नगरपंचायतींमध्ये Unified DCPR प्रमाणे BPMS सुधारित संगणकीय प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार असून दि.१५.०८.२०२१ रोजी पर्यंत राज्यातील उर्वरित सर्व नगरपरिषदा / नगरपंचायतींमध्ये Unified DCPR प्रमाणे BPMS सुधारित संगणकीय प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यानुसार संबंधित सर्व नगरपरिषदा / नगरपंचायतींचे मुख्याधिकारी यांनी त्यांचेकडील संगणक प्रणाली महाआयटीने तयार केलेल्या प्रणालीनुसार सुधारित करुन घेऊन त्यानुसार सदर संगणक प्रणाली ज्या दिवशी महाआयटी कडून वापरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल, त्या दिवसापासून विकास / बांधकाम परवानगीचे नवीन प्रस्ताव या संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन स्वीकारुन परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्थास कळविले आहे.

०५. त्यानंतर शासनाने संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये उपरोक्त मुद्दा २ मध्ये नमूद प्राधिकरणांना, महाआयटीमार्फत विकसित होत असलेली BPMS संगणकीय प्रणाली पुर्णपणे विकसित होत नाही तोपर्यंत त्यांचेकडे दाखल होणारे विकास परवानगी प्रस्ताव ऑफलाईन पध्दतीने स्वीकारुन अशा प्रस्तावांना मंजूरी देण्याची कार्यवाही दि.३१/१२/२०२१ पर्यंत करण्यास मान्यता दिली आहे. तर यानंतर सोलापूर व लातूर महानगरपालिकांनी केलेल्या विनंतीस अनुसरुन, Unified DCPR प्रमाणे महाआयटीने तयार केलेल्या BPMS संगणकीय प्रणालीनुसार ऑनलाईन विकास परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यास शासनाने संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये मान्यता दिली आहे.

०६. उपरोक्त विषयास अनुसरुन मा.प्रधान सचिव नवि-१, यांचेकडे दि.१५/११/२०२१ रोजी आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मला प्राप्त सूचनांनुसार आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

आपल्या कार्यक्षेत्रामध्ये प्राप्त होणारे विकास परवानगी प्रस्ताव ऑफलाईन स्वीकारुन अशा प्रस्तावांना मंजूरी देण्याची कार्यवाही करण्यास शासनाने दि.३१/१२/२०२१ पर्यंत मुदत दिली आहे. सदर मुदतीनंतर आपल्या कार्यालयामध्ये प्राप्त होणारे सर्व विकास परवानगी प्रस्ताव महाआयटीने विकसित केलेल्या BPMS संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन स्वीकारुन अशा प्रस्तावांना मंजूरी देण्याची कार्यवाही

करणे आवश्यक आहे. या मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ मिळणार नाही. तसेच दि.०१/०१/२०२२ पासून आपल्या कार्यालयाकडे प्राप्त होणारे कोणतेही विकास परवानगी प्रस्ताव ऑफलाईन पध्दतीने स्वीकारले जाणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

**आपला,**

(किशोर वि.गोखले)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी :-**

१. मा.व्यवस्थापकीय संचालक, महाआयटी,
२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाआयटी.
तिसरा मजला, एपीजे हाऊस, के.सी.कॉलेज जवळ, चर्चगेट, मुंबई-४०००२०.

/- उपरोक्त विषयास अनुसरुन महाआयटीमार्फत Unified DCPR विकसित करण्यात येत असलेली संगणक प्रणाली (BPMS) उपरोक्त सर्व प्राधिकरणे/नियोजन प्राधिकरणे यांना दि.३१/१२/२०२१ पूर्वी उपलब्ध करुन व कार्यान्वित करुन देण्यात यावी असे कळविण्याच्या मला सूचना आहेत.

**प्रत :-**

१. मा.प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा.संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग.
४. मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. मा.सहसंचालक, नगर रचना, संबंधित सर्व विभाग.
६. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाआयटी.
७. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाऑनलाईन.
८. मा.संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई.

/- उपरोक्त अनुषंगाने आपल्या स्तरावरुनही सर्व संबंधितांना सूचना देणेस विनंती आहे.